# प्रधान मुख्य वनसंरक्षक, (वनबल प्रमुख) महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे कार्यालय.

अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर, पहिला माळा, बी विंग, वनभवन, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१.
दुरध्वनी क्र.(०७१२) २५५६०६७५ ई मेल-nodalmahngp@rediffmail.com, apccfnodal@mahaforest.gov.in


क्रमांक:कक्ष-१७/नोडल/१७-४/ओएफसी/2129 /१४-१५
नागपूर - ४४० ००१, दिनांक :- 3/3/2015

प्रति,

मुख्य वनसंरक्षक (प्रा)

सर्व

**विषय:-** महाराष्ट्रातील सर्व ग्रामपंचायतींना भारत ब्रॉडबँन्ड नेटवर्क लि. (BBNL) मार्फत ऑप्टीकल फायबर आधारीत ब्रॉडबँन्ड कनेक्टीव्हीटी देण्याबाबत.

**संदर्भ:-** १) सचिव, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. जीएडी-मातंसं/२०/२०१३-डीआयआर-डीआयटी(एमएच)/ डीआयटी, दि. ११/११/२०१३

२) प्रधान सचिव, माहिती तंत्रज्ञान, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांचे पत्र क्र. जीएडी-मातंसं ०८२/१/२०१३-डीआयआर-डीआयटी (एमएच)-डीआयटी (एमएच), दि. ९/७/२०१४

३) शासन ग्राम विकास विभाग परिपत्रक क्र.संग्राम-२०१३/प्रक्र.५१/संग्राम कक्ष यांचे पत्र दिनांक ५/८/२०१४

४) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल) प्रमुख यांचे पत्र क्र.कक्ष-१७/नोडेल /१७-४/ओएफसी/१८८३ दि.२२/१/२०१५

५) शासन परिपत्र क्र एफएलडी-२०१५/प्रक्र.८/२०१५/फ-१०, दि.२३/२/२०१५

उपरोक्त संदर्भिय शासन पत्र क्र.५ अवलोकनार्थ व आवश्यक कार्यवाहीस सोबत सहपत्रीत करण्यात येत आहे. विषयांकित प्रकरणी केंद्र शासनाने नॅशनल ऑप्टीकल फायबर नेटर्वक (NOFN) या योजनेव्दारे देशातील जवळजवळ २,५०,००० ग्रामपंचायतींना ऑप्टीकल फायबर नेटर्वकव्दारे ब्रॉडबॅण्ड इंटरनेट कनेक्शन उपलब्ध करुन देण्याकरीता प्रस्तुत प्रकल्प राष्ट्रीय हिताचा एक महत्वपूर्ण प्रकल्प असल्याने व सदर प्रकल्पाची अंमलबजावणी योग्य प्रकारे व त्वरेने होण्याकारीता वन विभागाचे आवश्यक ते सहकार्य प्रकल्प यंत्रणेस मिळावे य अनुषंगाने संदर्भिय पत्र क्र.५ अन्वये खालील मार्गदर्शक सूचना परिपत्रकाव्दारे दिल्या आहेत:-

१.० केंद्र शासनाचे पत्र दिनांक १६.१०.२००० नूसार प्राप्त मार्गदर्शक सूचनाप्रमाणे जेथे वृक्षतोडीचे अंर्तभाव नाही व असे वनक्षेत्र राष्ट्रीय उद्यान किंवा अभयारण्याच्या बाहेर आहे, तसेच सदर काम अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या बाजूला व सदर रस्त्याच्या राईट ऑफ वे मध्ये करावयाचे आहे आणि त्यासाठी जास्तीत एक मीटर रुंद व दोन मीटर खोल या आकाराचा खंदक खोदावा लागेल, अशा वनक्षेत्राच्या वनेत्तर वापराकरीता वन (संवर्धन) अधिनियम १९८० च्या कलम (२) प्रमाणे खालील अटींच्या आधीन राहून सर्वसाधारण मान्यता (general approval) प्रदान केली आहे व अशी परवानगी देण्याबाबत संबंधीत उपवनसंरक्षक (प्रादेशिक) यांना फक्त वनक्षेत्रातून जाणा-या या रस्त्याच्या राईट ऑफ वे मध्ये परवानगी देण्यासाठी शासनाने प्राधिकृत केले आहेत.

i. प्रकल्प येत्रणेस प्रपत्र-अ मध्ये अर्ज करण्याची आवश्यकता नाही, मात्र त्यांनी अर्जकरताना रस्त्याचा तपशील, रस्त्याचा नकाशा व अस्तित्वात असलेल्या राईट ऑफ वे ची रूंदी नमूद करणे आवशक राहिल.

ii. प्रकल्प यंत्रणा वन/पर्यावरणाच्या होणा-या नुकसानीची भरपाई करण्यास तयार असेल.

iii. प्रकल्प यंत्रणा वनजमिनीच्या उपयोगानंतर त्याला पूर्ववत करण्यास तयार असेल.

iv. प्रकल्प यंत्रणा प्रकल्पाच्या देखभालीकरिता स्थानिक वन विभागाची परवानगी घेईल.

v. वनक्षेत्राच्या वैधानिक दर्जात बदल होणार नाही व सदर वनक्षेत्र वन विभागाच्या ताब्यात राहील.

तरी मुख्य वनसंरक्षक (प्रा) सर्व यांनी आपल्या स्तरावरुन सर्व उपवनसंरक्षक (प्रा) यांना वरील प्रमाणे आवश्यक निर्देश देण्यात यावे. तसेच संबंधित उपवनसंरक्षक (प्रा) BBNL यास भूमिगत ऑप्टीकल फायबर केबल टाकण्यासाठी दिलेल्या परवानगी आदेशाच्या प्रती संबंधित मुख्य वनसंरक्षक (प्रा), अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर करतील. सदर प्रकरणी वन (संवर्धन) अधिनियम १९८० चा भंग होणार नाही याची दक्षता घ्यावी

**सहपत्र:-** वरील प्रमाणे

मसुदा प्र.मु.व.सं.(वन बल प्रमुख)
म.रा.नागपूर यांचेकडून अनुमोदित

**प्रधान मुख्य वनसंरक्षक व (वन बल प्रमुख)**
**महाराष्ट्र राज्य, नागपूर**

**प्रतिलिपी:-** सचिव (वने), महसूल व वनविभाग, मंत्रालय, मुंबई-३२ यांना संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने माहितीस सस्नेह अग्रेषित.

**प्रतिलिपी:-** सहपत्रासह सचिव,माहिती तंत्रज्ञान, समान्य प्रशासन विभाग ७ वा मजला मंत्रालय, मुंबई यांना संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने माहितीस सस्नेह अग्रेषित.

**प्रतिलिपी:-** सहपत्रासह प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव) म.रा.नागपूर यांना माहितीस सस्नेह अग्रेषित.

**प्रतिलिपी:-** अपर महाप्रबंधक बीएसएनएल (BSNL) वेस्टर्न टेलीकॉम प्रोजेक्ट (EMA) दुसरा माळा, माइक्रोव्हेव, बिलडींग, सि.टी.ओ.सिव्हील लाईन नागपूर यांना संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने सहपत्रासह माहितीस अग्रेषित

**प्रतिलिपी:-** सहपत्रासह Chief General Manager, Maharashtra Telecom Circle, 5 D Wing, Admn Building, Juhu Road, Santacurz (West) यांना संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने माहितीस व आवश्यक कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित.

**प्रतिलिपी:-** सहपत्रासह Chief General Manager, (Bharat Broadband Network Ltd) 2nd floor, B wing, Admn Building, Juhu Road, Santacurz (West) Mumbai -54, यांना संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने माहितीस व आवश्यक कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित.

**प्रतिलिपी:-** सहपत्रासह Sr. General Manager, BSNL, Telecom Bhavan, Zero Miles, Nagpur यांना संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने माहितीस व आवश्यक कार्यवाहीस सस्नेह अग्रेषित.

महाराष्ट्रातील सर्व ग्रामपंचायतींना
भारत ब्रॉडबँड नेटवर्क लि. (BBNL)
मार्फत ऑप्टीकल फायबर आधारीत
कनेक्टीव्हीटी देण्याबाबत.......

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन परिपत्रक क्रमांक:एफएलडी-२०१५/प्र.क्र.८/२०१५/फ-१०
मंत्रालय, मुंबई-४०००३२
तारीख: २६/०२/२०१५

वाचा -

१) माहिती व तंत्रज्ञान विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुबई यांचे पत्र क्र. जीएडी-मातंस/ २०/२०१३-डीआयआर-डीआएटी (एमएच)/ डीआयटी, दि.११.११.२०१३

२) माहिती व तंत्रज्ञान विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुबई यांचे पत्र क्र. जीएडी-मातंस ०८२/१/२०१३-डीआयआर-डीआएटी(एमएच)-डीआयटी, दि.०९.०७.२०१४

३) ग्राम विकास विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुबई यांचे परिपत्रक क्र. संग्राम-२०१३/प्र.क्र. ५१/संग्राम कक्ष, दि.०५.०८.२०१४

४) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर यांचे पत्र क्र. कक्ष-१७/नोडल/१७-४/ओएफसी/१८८३/१४-१५, दि.२२.०१.२०१५

प्रस्तावना :-

केंद्र शासनाने नॅशनल ऑप्टीकल फायबर नेटवर्क (NOFN) या योजनेव्दारे देशातील जवळजवळ २,५०,००० ग्रामपंचायतींना ऑप्टीकल फायबर नेटवर्कव्दारे ब्रॉडबँड इंटरनेट कनेक्शन उपलब्ध करून देण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. त्याकरीता केंद्र शासनाने भारत ब्रॉडबँड नेटवर्क लि. (BBNL) ही कंपनी स्थापन केली आहे. नॅशनल ऑप्टीकल फायबर नेटवर्क (NOFN) ही राष्ट्रीय संपत्ती म्हणून निर्माण करण्यात येत आहे. राज्यातील ग्रामपंचायत स्तरापर्यंत उच्च क्षमता व उच्च दर्जाची ब्रॉडबँड इंटरनेट कनेक्टीव्हीटी उपलब्ध करून देण्यात येत आहे. राज्यात या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी केंद्र शासन, राज्य शासन व BBNL या तिघांमध्ये दि.१२/०४/२०१३ रोजी त्रिपक्षीय सामंजस्य करारनामा (Tripartite Memorandum of Understanding) करण्यात आलेला आहे.

माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या दि.०९.०७.२०१४ च्या पत्रान्वये त्रिपक्षीय करारनाम्यानूसार राज्यशासनाने BBNL या कंपनीला नॅशनल ऑप्टीकल फायबर नेटवर्क अंतर्गत राज्यात ग्रामपंचायत स्तरापर्यंत ऑप्टीकल फायबर नेटवर्क टाकण्यासाठी प्राधिकृत केले असून, या अंतर्गत ऑप्टीकल फायबर टाकण्यासाठी नि:शुल्क मार्ग हक्क (Right of Way) मिळणार असून इतर कोणत्याही विभागाची

पूर्व मान्यता लागणार नाही. राज्य शासनाने नि:शुल्क मार्ग हक्कासाठी दिलेली पूर्ण सहमती (Blanket Approval) ही राज्यशासनाच्या सर्व प्रशासकीय विभागावर बंधनकारक असल्याचे तसेच ग्रामीण भागातील निशुल्क मार्गहक्कासाठी कोणताही परवाना अथवा पुर्नभरणा शुल्क आकारण्यात येणार नाहीत अशा सूचना निर्गमित केल्या आहेत. ग्रामविकास विभागाच्या दि.०५.०८.२०१४ च्या परिपत्रकान्वये देखील नॅशनल ऑप्टीकल फायबर नेटवर्क अंतर्गत ऑप्टीकल फायबर टाकण्यासाठी त्रिपक्षीय कराराननामा झाल्यामूळे नि:शुल्क मार्ग हक्क (Right of Way) मिळणार असून इतर कोणत्याही प्रशासकिय विभागाची /यंत्रणेच्या पूर्व मान्यतेची आवश्यकता लागणार नाही, अशा सूचना निर्गमित केल्या आहेत.

भारत ब्रॉडबँड नेटवर्क लि. या प्रकल्प यंत्रणेने वन विभागाने नियमित दस्ताऐवजांच्या पध्दतीबाबत आग्रह धरू नये, अशी विनंती प्रधान मुख्य वनसंरक्षक कार्यालयास केली आहे. प्रधान मुख्य वनसंरक्षक यांनी सदर प्रकरणी वन (संवर्धन) अधिनियम, १९८० अंतर्गत प्रस्ताव सादर करण्याची आवश्यकता आहे किंवा कसे, याबाबत मार्गदर्शन करण्याची विनंती शासनास केली आहे. प्रस्तुत प्रकरणी एकूणच विविध विभागाकडून देण्यात आलेले निर्देश व वन (संवर्धन) अधिनियम,१९८० अंतर्गत असलेल्या मार्गदर्शन सूचना यामुळे क्षेत्रिय स्तरावर संभ्रम निर्माण झाल्याचे दिसून येत आहे. प्रस्तुत प्रकल्प राष्ट्रीय हिताचा एक महत्वपूर्ण प्रकल्प असल्याने व सदर प्रकल्पाची अंमलबजावणी योग्य प्रकारे व त्वरेने होण्याकरीता वन विभागाचे आवश्यक ते सहकार्य प्रकल्प यंत्रणेस मिळावे या अनुषंगाने शासन खालील मार्गदर्शक सूचना या परिपत्रकाव्दारे देत आहे.

**शासन परिपत्रक:-**

१. केंद्र शासनाच्या दि.१६.१०.२००० च्या पत्रान्वये प्राप्त मार्गदर्शक सूचनेनूसार जेथे वृक्ष तोडीचा अंतर्भाव नाही व असे वनक्षेत्र राष्ट्रीय उदयान किंवा अभयारण्याच्या बाहेर आहे, तसेच सदर काम अस्तित्वात असलेल्या रस्त्याच्या राईट ऑफ वे मध्ये करावयाचे आहे आणि त्यासाठी जास्तीत जास्त एक मीटर रुंद व दोन मीटर खोल या आकाराचा खंदक खोदावा लागेल, अशा वनक्षेत्रातून जाणा-या रस्त्याच्या कडेने भूमिगत ऑप्टीकल फायबर केबल टाकण्याकरीता फक्त भारत ब्रॉडबँड नेटवर्क लि. (BBNL) च्या ऑप्टीकल फायबर केबलच्या प्रस्तावास वन (संवर्धन) अधिनियम,१९८० च्या कलम (२) प्रमाणे खालील अटींच्या अधीन राहून सर्वसाधारण मान्यता (general approval) प्रदान करण्यात येत आहे व अशी परवानगी देण्याबाबत संबंधित उप वनसंरक्षक (प्रादेशिक) यांना फक्त वनक्षेत्रातून जाणा-या रस्त्याच्या राईट ऑफ वे मध्ये परवानगी देण्यासाठी प्राधिकृत करण्यात येत आहे.

i. प्रकल्प यंत्रणेस प्रपत्र-अ मध्ये अर्ज करण्याची आवश्यकता नाही, मात्र त्यांनी अर्ज करताना रस्त्याचा तपशील, रस्त्याचा नकाशा व अस्तित्वात असलेल्या राईट ऑफ वे ची रुंदी नमूद करणे आवश्यक राहिल.

ii. प्रकल्प यंत्रणा वन/पर्यावरणाच्या होणा-या नुकसानीची भरपाई करण्यास तयार असेल.

iii. प्रकल्प यंत्रणा वनजमिनीच्या उपयोगानंतर त्याला पूर्ववत करण्यास तयार असेल.

iv. प्रकल्प यंत्रणा प्रकल्पाच्या देखभालीकरीता स्थानिक वन विभागाची परवानगी घेईल.

v. वनक्षेत्राच्या वैधानिक दर्जात बदल होणार नाही व सदर वनक्षेत्र वन विभागाच्या ताब्यात राहील.

संबंधित उप वनसंरक्षक (प्रा.) BBNL यास भूमिगत ऑप्टीकल फायबर केबल टाकण्यासाठी दिलेल्या परवानगी आदेशाच्या प्रती संबंधित मुख्य वनसंरक्षक (प्रा), अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर यांना सादर करतील. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक तथा केंद्रस्थ अधिकारी, महाराष्ट्र राज्य, नागपूर संपूर्ण राज्यात उप वनसंरक्षक (प्रा) यांच्याद्वारे दिलेल्या आदेशाबाबतचा एकत्रित त्रैमासिक अहवाल शासनास / केंद्र शासनास सादर करतील.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१५०२२६१३०१४१५६१९ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

TIWARI VIRENDRA RAMBAHAL

Digitally signed by TIWARI VIRENDRA RAMBAHAL
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=REVENUE AND FOREST,CID - 917243, postalCode=400032, st=Maharashtra, cn=TIWARI VIRENDRA RAMBAHAL
Date: 2015.02.26 13:11:25 +05'30'

(वीरेन्द्र तिवारी)
मुख्य वनसंरक्षक (मंत्रालय)
महसूल व वन विभाग

प्रत :-

१. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
२. मा.मंत्री (वने) यांचे खाजगी सचिव
३. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई